# कार्यकारी सारांश

महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र, हे राज्य पारेषण प्रणालीचे एकात्मिक संचलन करणारी शिखर संस्था आहे. महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र, ऐरोली व भार प्रेषण केंद्र , अंबाझरी- नागपूर येथून संचलन केले जाते आणि अतिरिक्त उपप्रेषण केंद्र, मुंबई याचे स्वतंत्र नियंन्नन कक्ष संचालन करण्याकरिता महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र, ऐरोली येथे कार्यान्वीयत आहे.

वीज कायदा २००३ चे कलम ३१ (२) नुसार महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित व राज्य पारेषण उपक्रम एसटीयू यांच्या मार्फत महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राचे संचलन केले जाते.

आर्थिक वर्ष २०१९-२० साठीच्या सध्याची अतिंम समायोजन याचीका ही महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग (बहु वर्षीय वीज दर) विनिमय, २०१५ ( बहु वर्षीय वीज दर विनिमय २०१५) च्या लागू तरतुर्दीवर आधारित आहे. तथापि, वित्तीय वर्ष २०२०-२१ आणि आर्थिक वर्ष २०२१-२२ साठी अतिंम समायोजन महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग (बहु वर्षीय वीज दर) विनिमय, २०१९ ( बहु वर्षीय वीज दर विनिमय २०१९) मध्ये दिलेल्या तरतुर्दींच्या आधारे तयार केले आहे. आथिक वर्ष २०२२-२३ साठी तात्पुरते समायोजन सादर करण्यासाठी समान नियमांचा संदर्भ देण्यात आला आहे. तसेच नियंत्रण कालावधीच्या उर्वरित कालावधीसाठी सुधारीत ए आर आर अंदाज (वित्तवर्ष २०२३-२४ ते वित्तवर्ष २०२४-२५) महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग (बहु वर्षीय वीज दर) विनिमय,२०१९ मध्ये दिलेल्या तरतुर्दींच्या आधारावर तयार केला आहे.

बहु वर्षीय वीज दर विनिमय, २०१९ च्या विनिमय ५.१ (बी) नुसार याचिकाकर्त्याने मध्यावधी पुर्नवलोकनासाठी याचिका समायोजन, तात्पुरते समायोजन आणि सुधारित ए आर आर आणि सुधारित आकार आणि शुल्कांसाठी दाखल केली आहे. म्हणून बहु वर्षीय वीज दर विनिमय, २०१९ च्या विनिमय ५.१ (बी) महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र यासाठी सध्याची याचिका दाखल करत आहे.

- आर्थिक वर्ष २०१९-२० ते आर्थिक वर्ष २०२१-२२ साठी समायोजनासाठी मान्यता,
- आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी तात्पुरत्या समायोजनासाठी मान्यता आणि
- आर्थिक वर्ष २०२३-२४ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी सुधारित ए आर आर आणि त्याच कालावधीसाठी दर निश्चिती आणि प्रभार निश्चिती.

आर्थिक वर्ष २०१९-२० ते आर्थिक वर्ष २०२१-२२ साठी समायोजन महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र (MSLDC) च्या लेखापरीक्षित अहवालावर आधारित आहे. बहु वर्षीय वीज दर विनिमय, २०१५ आणि २०१९ च्या तरतुर्दीनुसार, नियंत्रण करण्यायोग्य घटकांच्या वास्तविक नफा/तोटा योग्यरित्या घटकांस समाविष्ट केला गेला आहे. तात्पुरते समायोजन हे या आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी उपलब्ध असलेल्या वास्तविक खर्च व उत्पन्नावर आणि आर्थिक वर्षाच्या उर्वरित कालावधीसाठीच्या अंदाजित माहितीवर आधारित आहे.

महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राने सध्या याचिकेची तयारी करतांना माननीय आयोगाने आपल्या आधीच्या दोन आदेशांमध्ये (३० मार्च २०२० रोजीचा बहु वर्षीय वीजदर आदेश आणि १२ सप्टेंबर, २०१८ रोजीचा एम टी आर आदेश) अनुसरण केलेल्या निर्देशांचा आणि दृष्टीकोनाचाही विचार केला आहे.

आर्थिक वर्ष २०१९-२० साठी सत्यता
२०१९ च्या प्रकरण क्रमांक २९१ मधील आदेशात आर्थिक वर्ष २०१९-२० साठी मंजूर केलेले तात्पुरते समायोजन (रू. ४२७.५३) लाख होते. खालील तक्ता प्रत्यक्ष जमा खर्च व अतिरिक्त / घट, प्रत्यक्ष खर्च याचा सारांश दर्शविलेला आहे.

तक्ता १ - आर्थिक वर्ष २०१९-२० साठीचे समायोजन (लाख रुपये)

| अ. क्र. | तपशील | आर्थिक वर्ष २०१९-२० | | | नफा वाटप केल्यानंतर निव्वळ हक्क /तोटा |
|---|---|---|---|---|---|
| | | २०१९ च्या प्रकरण क्र. २९१ मध्ये मंजूर | एप्रिल-मार्च (ऑडिट केलेले) | समा योजनाची आवश्यकता | |
| | | अ | ब | क त्र ब - अ | |
| १ | संचलन व सुव्यवस्था खर्च | २५५५.४८ | २६७५.३३ | ११९.८५ | २५५०.९१ |
| २ | आरएलडीसी शुल्क आणि डब्ल्यूआरपीसी शुल्क | ७८२.१४ | ४९८.५९ | -२८३.५५ | ४९८.५९ |
| ३ | घसारा | १६७.०१ | २९०.५५ | १२३.५४ | २९०.५५ |
| ४ | भांडवल कर्जावरील व्याज | १०९.०८ | १५०.५१ | ४१.४३ | १५०.५१ |
| ५ | कार्यरत भांडवलावर व्याज | ५४.९८ | ५४.३० | -०.६८ | १८.१० |
| ६ | वीजनिर्माता / प्रेषण उपयोगकर्त्याला दिलेले रिऍक्टीव्ह उर्जा प्रभार | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ७ | आयकर | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ८ | एकूण महसूल खर्च | ३६६८.६९ | ३६६९.२८ | ०.५९ | ३५०८.६७ |
| ९ | भाग भांडवलावरील परतावा | १९६.४५ | २४६.३४ | ४९.८९ | २४६.३४ |
| १० | म.रा.भा.प्रे.कें साठी एकूण खर्च | ३८६५.१४ | ३९१५.६२ | ५०.४८ | ३७५५.०१ |
| ११ | वजा- इतर उत्पन्न | २५६.७१ | ४११.५८ | १५४.८७ | ४११.५८ |
| १२ | वजा- ओपन ॲक्सेस चार्जेसचे उत्पन्न | ११३४.०० | १३६५.८७ | २३१.८७ | १३६५.८७ |
| १३ | वजा- रिॲक्टिव उर्जा प्रभार उत्पन्न | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| १४ | म.रा.भा.प्रे.कें करिता वार्षिक कायम प्रभार | २४७४.४४ | २१३८.१७ | -३३६.२७ | १९७७.५६ |
| १५ | महसूल | २९०१.९७ | २९०२.०८ | ०.११ | २९०२.०८ |
| १६ | महसूलातील अंतर (अभिशेष) | **-४२७.५३** | **-७६३.९१** | **- ३३६.३८** | **-९२४.५२** |

'अधिशेष रक्कम वजा खूण व कंसात दाखविलेली आहे'

अशा प्रकारे आर्थिक वर्ष २०१९-२० समायोजना मध्ये जो रु. ९२४.५२ लाखाचा अभिशेष आहे तो एलडीसीडी निधीमध्ये विचारात घेतला गेला आहे. २०१९ च्या प्रकरण क्रमांक २९१ अंतर्गत माननीय आयोगाच्या निर्देशानुसार समायोजन झाल्यानंतर अतिरिक्त रक्कम एलडीसी विकास निधीमध्ये हस्तांतरित केली जात आहे.

**आर्थिक वर्ष २०२०-२१ साठी समायोजन**

आयोगाच्या आदेशानुसार २०१९ च्या प्रकरण क्रमांक २९१ मध्ये, आर्थिक वर्ष २०२०-२१ साठी ए आर आर महसूल अंदाज ३३९१.६० लाख होता. वरील चर्चेच्या आधारे वास्तविक प्राप्ती आणि दर्शविलेल्या खालील तक्ता प्रत्यक्ष जमा खर्च व अतिरिक्त / घट, प्रत्यक्ष खर्च याचा सारांश दर्शविलेला आहे.

### तक्ता २ - आर्थिक वर्ष २०२०-२१ साली (रुपये लाख)

| अ. क्र. | तपशिल | २०१९ च्या प्रकरण क्रमांक २९१ मध्ये मंजूर | एप्रिल-मार्च (ऑडिट केलेले) | सत्यापन आवश्यकता | नफा वाटप केल्यानंतर निव्वळ हक्क / तोटा |
|---|---|---|---|---|---|
| १ | संचलन व सुव्यवस्था खर्च | ३४०३.७३ | ३०२५.९६ | - ३७७.७७ | २८००.४९ |
| २ | आरएलडीसी शुल्क आणि डब्ल्यूआरपीसी प्रभार | ८७४.४१ | ५११.८३ | -३६२.५८ | ५११.८३ |
| ३ | घसारा | १४२.४० | २९०.४६ | १४८.०६ | २९०.४६ |
| ४ | भांडवल कर्जावरील व्याज | ९३.४३ | १२२.५८ | २९.१५ | १२२.५८ |
| ५ | कार्यरत भांडवलावर व्याज | ६७.५८ | ५४.५३ | -१३.०५ | १८.१८ |
| ६ | वीजनिर्माता / प्रेषण उपयोगकर्त्याला दिलेले रिऍक्टीव्ह उर्जा प्रभार | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ७ | आयकर | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ८ | एकूण महसूल खर्च | ४५८१.५५ | ४००५.३५ | -५७६.२० | ३७४३.५३ |
| ९ | भाग भांडवलावरील परतावा | १७७.४४ | २२२.५० | ४५.०६ | २२२.५० |
| १० | म.रा.भा.प्रे.कें साठी एकूण खर्च | ४७५८.९९ | ४२२७.८५ | -५३१.१४ | ३९६६.०३ |
| ११ | वजा- इतर उत्पन्न | २१०.७१ | ४५६.०४ | २४५.३३ | ४५६.०४ |
| १२ | वजा- ओपन ॲक्सेस चार्जेसचे उत्पन्न | ११५६.६८ | ८५४.३३ | -३०२.३५ | ८५४.३३ |
| १३ | वजा- रिॲक्टिव उर्जा प्रभार उत्पन्न | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| १४ | म.रा.भा.प्रे.कें करिता वार्षिक कायम प्रभार | ३३९१.६० | २९१७.४८ | -४७४.१२ | २६५५.६६ |
| | | | | | |
| १५ | महसूल | ३३९१.६० | ३३८८.७७ | -२.८३ | ३३८८.७७ |
| | | | | | |
| १६ | महसूलातील अंतर (अभिशेष) | **०.००** | **-४७१.२९** | **-४७१.२९** | **-७३३.११** |

अशा प्रकारे, आर्थिक वर्ष २०२०-२१ साठी समायोजनावर रु. (७३३.११) लाख अभिशेष आहे.२०१९ च्या प्रकरण क्रमांक २९१ अंतर्गत माननीय आयोगाच्या निर्देशांनुसार,सत्य झाल्यानंतर अतिरिक्त रक्कम एलडीसी विकास निधीमध्ये हस्तांतरीत केली जात आहे

**आर्थिक वर्ष २०२१-२२ साठी समायोजन**

**आर्थिक वर्ष २०२१-२२ मधील वास्तविक खर्चासाठी विभाग निहाय अंदाजित खर्च खालील तक्त्यामध्ये सारांशित केले आहेत.**

| अ. क्र. | तपशिल | २०१९ च्या प्रकरण क्रमांक २९१ मध्ये मंजूर | एप्रिल-मार्च (ऑडिट केलेले) | सत्यापन आवश्यकता | नफा वाटप केल्यानंतर निव्वळ हक्क / तोटा |
|---|---|---|---|---|---|
| १ | संचलन व सुव्यवस्था खर्च | ३०२१.३५ | ३४५३.८० | ४३२.४५ | ३११६.३२ |
| २ | आरएलडीसी शुल्क आणि डब्ल्यूआरपीसी प्रभार | १०५५.१६ | ५८४.९८ | -४७०.१८ | ५८४.९८ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | घसारा | ११६.३० | २४२.८२ | १२६.५२ | २४२.८२ |
| ४ | भांडवल कर्जावरील व्याज | ८०.३४ | ८४.२५ | ३.९१ | ८४.२५ |
| ५ | कार्यरत भांडवलावर व्याज | ६२.३५ | ५३.७६ | -८.५९ | १७.९२ |
| ६ | वीजनिर्माता / प्रेषण उपयोगकर्त्याला दिलेले रिॲक्टीव्ह उर्जा प्रभार | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ७ | आयकर | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ८ | एकूण महसूल खर्च | ४३३५.५० | ४४१९.६१ | ८४.११ | ४०४६.२९ |
| ९ | भाग भांडवलावरील परतावा | १७७.४४ | २२२.५५ | ४५.०६ | २२२.५० |
| १० | म.रा.भा.प्रे.कें साठी एकूण खर्च | ४५१२.९४ | ४६४२.११ | १२९.१७ | ४२६८.७९ |
| ११ | वजा- इतर उत्पन्न | १२४.५६ | ३५७.७५ | २३३.१९ | ३५७.७५ |
| १२ | वजा- ओपन ॲक्सेस चार्जेसचे उत्पन्न | ११७९.८१ | १५७२.४७ | ३९२.६६ | १५७२.४७ |
| १३ | वजा- रिॲक्टिव उर्जा प्रभार उत्पन्न | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| १४ | म.रा.भा.प्रे.कें करिता वार्षिक कायम प्रभार | ३२०८.५७ | २७११.८९ | -४९६.६८ | २३३८.५६ |
| १५ | महसूल | ३२०८.५७ | ३२११.२४ | २.६७ | ३२११.२४ |
| १६ | महसूलातील अंतर (अभिशेष) | **०.००** | **-४९९.३६** | **-४९९.३६** | **-८७२.६८** |

अशा प्रकारे, आर्थिक वर्ष २०२१-२२ साठी समायोजन केल्यानंतर रु. ८७२.६८ लाख अधिशेष होते. २०१९ च्या प्रकरण क्रमांक २९१ मधील निर्देशांनुसार महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राने ही रक्कम एलडीसी विकास निधीमध्ये हस्तांतरित करण्याचा प्रस्ताव दिला आहे. २०१९ च्या प्रकरण क्रमांक २९१ अंर्तगत माननीय आयोगाच्या निर्देशांनुसार आर्थिक वर्ष २०१९-२० ते आर्थिक वर्ष २०२१-२२ या कालावधीत भांडवलीकरणासाठी निधीचा विचार एलडीसी विकास निधीमध्ये जमा झालेल्या रकमेतून करण्यात आला आहे.

**भांडवलीकरण ( आर्थिक वर्ष २०१९-२० ते २०२१-२२ चा प्रत्यक्ष खर्च )**

| अ. क्र. | तपशिल | आर्थिक वर्ष २०१९-२० | | आर्थिक वर्ष २०२०-२१ | | आर्थिक वर्ष २०२१-२२ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मंजूर | लेखांकित | मंजूर | लेखांकित | मंजूर | लेखांकित |
| १. | भांडवलीकरण खर्च | १०१२.३६ | ५३१.२४ | १९२२.८ | १८१.४२ | १४४१.०० | ८००.६९ |

**प्रस्तावित भांडवलीकरण ( आर्थिक वर्ष २०२२-२३ ते २०२४-२५ )**

| अ. क्र. | तपशिल | आर्थिक वर्ष २०२२-२३ (तातपुरते समायोजन) | | आर्थिक वर्ष २०२३-२४ | | आर्थिक वर्ष २०२४-२५ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मंजूर | सुधारित | मंजूर | सुधारित | मंजूर | सुधारित |
| १. | प्रस्तावित भांडवलीकरण खर्च | १२०३.०० | ११६९.४१ | ३०६.०० | ४७९२.७८ | ३२०.०० | ४५६६.९० |

२०२३-२४ पर्यंत एलडीसीडी कडे भांडवलीकरणासाठी पुरेसा निधी उपलब्ध आहे. तथापि, आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी एलडीसीडी कडे उपलब्ध असलेल्या निधीतून आंशिक भांडवलीकरण प्रस्तावित आहे. उर्वरित निधी रक्कम कर्ज आणि इक्विटीच्या माध्यमतुन उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव आहे.

**तात्पुरते समायोजन आर्थिक वर्ष २०२२-२३ आणि आर्थिक वर्ष २०२३-२४ ते २०२४-२५ सुधारित ए आर आर**

माननीय आयोगाने महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग (बहु वर्षीय वीज दर) विनिमय, २०१९ प्रकाशित केले आहेत. जे १ एप्रिल २०२० ते ३१ मार्च २०२५ या पाच वर्षाच्या नियंत्रण कालावधीसाठी लागू आहे. नियमानुसार बहु वर्षीय वीज दर विनिमय, २०१९ च्या कलम ३.१ नुसार माननीय आयोग महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राने सह बहु वर्षीय वीज दर विनिमय, २०१९ नुसार एकूण महसूल आवश्यकता दर आणि शुल्क, त्यातील अटी व शर्तींसह निर्धारित करेल. . आथिक वर्ष २०२२-२३ साठी तात्पुरते समायोजन तसेच नियंत्रण कालावधीच्या उर्वरित कालावधीसाठी सुधारीत ए आर आर अंदाज वित्तवर्ष २०२३-२४ ते वित्तवर्ष २०२४-२५ (वर्तमान नियंत्रण कालावधीच्या उर्वरित कालावधीसाठी एआरआर चे तपशील )खाली दिले आहेत.

**तक्ता ४ - तात्पुरते समायोजन आर्थिक वर्ष २०२२-२३ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी वार्षिक निश्चित शुल्काचा सारांश (रु. लाख)**

| अ. क्र. | तपशिल | आर्थिक वर्ष २०२२-२३ (तात्पुरते समायोजन) | |
|---|---|---|---|
| | | मंजूर | सुधारित |
| १ | संचलन व सुव्यवस्था खर्च | ३११७.८८ | ३४१२.४६ |
| २ | घसारा | ११४.०२ | २३७.०९ |
| ३ | दिर्घकालीन कर्जावरील व्याज | ६८.६८ | ६२.८२ |
| ४ | कार्यरत भांडवलावर व्याज | ६६.३५ | ६४.५३ |
| ५ | आरएलडीसी शुल्क आणि डब्ल्यूआरपीसी शुल्क | ११९५.४३ | ६५१.५२ |
| ६ | विजनिर्माता / पारेषण उपयोगकर्त्याला दिलेले रिऍक्टीव्ह उर्जा शुल्क | | |
| ७ | आयकर | | |
| ८ | एकूण महसूल खर्च | **४५६२.३६** | **४४२८.४२** |
| ९ | भाग भांडवलावरील परतावा | १७७.४४ | २२२.५० |
| १० | म.रा.भा.प्रे.कें साठी एकूण खर्च | **४७३९.८०** | **४६५०.९२** |
| ११ | वजा- - इतर उत्पन्न | ५६.८४ | ३३८.८६ |
| १२ | वजा- ओपन ॲक्सेस चार्जेसचे उत्पन्न | १२०३.४१ | १२०३.४१ |
| १३ | वजा- रिॲक्टिव उर्जा प्रभार उत्पन्न | | |
| १४ | म.रा.भा.प्रे.कें करिता वार्षिक स्थिर आकार | **३४७९.५६** | **३१०८.६४** |
| १५ | महसूल | **३४७९.५६** | **३४७९.५६** |

| | | | |
|---|---|---|---|
| १६ | अंतर /(अभिशेष) | ०.०० | -३७०.९२* |

* अभिशेष रक्कम एलडीसीडी फंडाअंतर्गत ठेवली जाईल.

| अ. क्र. | तपशिल | आर्थिक वर्ष २०२३-२४ | | आर्थिक वर्ष २०२४-२५ | |
|---|---|---|---|---|---|
| | | मंजूर | सुधारित | मंजूर | सुधारित |
| १ | संचलन व सुव्यवस्था खर्च | ३२१७.४९ | ३७६९.६५ | ३३२०.३९ | ३८५१.४२ |
| २ | घसारा | ११६.३८ | २०२.९० | १२७.६३ | २४९.७२ |
| ३ | दिर्घकालीन कर्जावरील व्याज | ६०.१७ | ४३.१८ | ६२.३० | १४०.८७ |
| ४ | कार्यरत भांडवलावर व्याज | ७०.४६ | ६६.५४ | ७२.५६ | ७३.११ |
| ५ | आरएलडीसी शुल्क आणि डब्ल्यूआरपीसी शुल्क | १३६१.३५ | ६८४.१० | १३६१.३५ | ७१८.३० |
| ६ | वीजनिर्माता / पारेषण उपयोगकर्त्याला दिलेले रिऍक्टीव्ह उर्जा शुल्क | | ०.०० | | ०.०० |
| ७ | आयकर | | ०.०० | | ०.०० |
| ८ | एकूण महसूल खर्च | ४८२५.८५ | ४७६६.३६ | ४९४४.१३ | ५०३३.४२ |
| ९ | भाग भांडवलावरील परतावा | १७९.३१ | २२२.५० | १८७.८९ | ३०१.७२ |
| १० | म.रा.भा.प्रे.कें साठी एकूण खर्च | ५००५.१५ | ४९८८.८५ | ५१३२.०२ | ५३३५.१४ |
| ११ | वजा- - इतर उत्पन्न | २०.४७ | १९३.४९ | १४.९० | ४८.२२ |
| १२ | वजा- ओपन ॲक्सेस चार्जेसचे उत्पन्न | १२२७.४८ | १२२७.४८ | १२५२.०३ | १२५२.०३ |
| १३ | वजा- रिॲक्टिव उर्जा प्रभार उत्पन्न | | | | |
| १४ | म.रा.भा.प्रे.कें करिता वार्षिक स्थिर आकार | ३७५७.२१ | ३५६७.८८ | ३८६५.१० | ४०३४.८९ |
| १५ | महसूल | ३७५७.२१ | ३५६७.८८ | ३८६५.१० | ४०३४.८९ |
| १६ | अंतर /(अभिशेष) | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |

आर्थिक वर्ष २०२२-२३ नंतरच्या संचलन आणि सुव्यवस्था खर्चाचे प्रक्षेपण करताना, याचिकाकर्त्याने आर्थिक वर्ष २०२०-२१ साठी (आर्थिक वर्ष २०-२१ अणि आर्थिक वर्ष २१-२२ चे सरासरी संचलन आणि सुव्यवस्था खर्च पासून तयार केला) आणि वाढीव घटकांवर आधारित समान विचार केला आहे. डब्ल्यूपीआय आणि सीपीआय चा आधार. याचिकाकर्त्याने माननीय आयोगाला बहु वर्षीय वीज दर विनिमय, २०१९ अंतर्गत कलम १०५ नुसार शिथिलीकरण्याच्या निहित अधिकारांचा लाभ घेऊन वरील दृष्टीकोनाचा विचार करण्याची विनंती केली आहे.

**एलडीसीडी (लाख रुपयांमध्ये)**

| तपशील | आर्थिक वर्ष १९-२० | आर्थिक वर्ष २०-२१ | आर्थिक वर्ष २१-२२ | आर्थिक वर्ष २२-२३ | आर्थिक वर्ष २३-२४ | आर्थिक वर्ष २४-२५ |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| वर्षाच्या सुरुवातीला एलडीसीडी निधी | ४६५७.२५ | ५७६२.१५ | ६३१३.८५ | ६३८५.८४ | ५५८७.३५ | ७९४.५७ |
| जोडा - २०१६ च्या प्रकरण क्र. २० नुसार | ७११.६२ | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| वसुल करावयाच्या अंतराचे विभाजन | | | | | | |
| वजा - वर्षातील महसूल अंतर / (अधिशेष) | -९२४.५२ | -७३३.११ | -८७२.६८ | -३७०.९२ | | |
| वजा- एलडीसीडी निधीचा वापर | ५३१.२४ | १८१.४२ | ८००.६९ | ११६९.४१ | ४७९२.७८ | ७९४.५७ |
| वर्षाच्या शेवटी एलडीसीडी फंड | ५७६२.१५ | ६३१३.८५ | ६३८५.८४ | ५५८७.३५ | ७९४.५७ | ०.०० |

**आर्थिक वर्ष २०२३-२४ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी म.रा.भा प्रे.कें. शुल्काची वाटणी**

**तक्ता ५ - आर्थिक वर्ष २०२३-२४ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी म.रा.भा प्रे.कें.शुल्काची प्रस्तावित वाटणी (रुपये लाखात)**

| अ. क्रं. | पारेषण प्रणाली वापरकर्ता | आर्थिक वर्ष २०२३-२४ | | आर्थिक वर्ष २०२४-२५ | |
|---|---|---|---|---|---|
| | | टीसीआर (मे.वॅ) | टीसीआर *(% मध्ये)* | टीसीआर (मे.वॅ) | टीसीआर *(% मध्ये)* |
| १ | म रा वि वि कं मर्या. | २१४७९ | ८६.४१% | २२१२९ | ८६.४१% |
| २ | टाटा वितरण | ७८९ | ३.१७% | ८१२ | ३.१७% |
| ३ | अदानी इलेक्ट्रीसीटी मुंबई लि - वितरण | १४२९ | ५.७५% | १४७३ | ५.७५% |
| ४ | बेस्ट | ७४१ | २.९८% | ७६४ | २.९८% |
| ५ | मध्य रेल्वे (भारतीय रेल्वे) | ३८० | १.५३% | ३९१ | १.५३% |
| ६ | मांईंडस्पेस बिझनेस पार्कस प्रा.लि. | ७ | ०.०३% | ७ | ०.०३% |
| ७ | गिगाप्लेक्स इस्टेट प्रा.लि. | ४ | ०.०२% | ४ | ०.०२% |
| ८ | केआरसी इनफ्रास्ट्रक्चर प्रोजेक्ट आणि प्रा.लि. | ३ | ०.०१% | ३ | ०.०१% |
| ९ | निदार युटीलिटीज पनवेल एलएलपी . | २ | ०.०१% | ३ | ०.०१% |
| १० | महाराष्ट्र विमानतळ विकास महामंडळ | १२ | ०.०५% | १२ | ०.०५% |
| ११ | इ ऑन फेज -१ | ६ | ०.०२% | ६ | ०.०२% |
| १२ | इ ऑन फेज -२ | ३ | ०.०१% | ३ | ०.०१% |
| १३ | जेएनपीटी | ० | ०.००% | ० | ०.००% |
| १४ | लक्ष्मीपती बालाजी | १ | ०.००% | १ | ०.००% |
| | | ० | ०.००% | ० | ०.००% |
| | **एकूण टीसीआर सर्व टीएसयू साठी** | **२४८५६** | **१००.००%** | **२५६०८** | **१००.००%** |

| पारेषण प्रणाली वापरकर्ते | आर्थिक वर्ष २३-२४ | आर्थिक वर्ष २४-२५ |
|---|---|---|
| म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित | ३०८३.१७ | ३४८६.७३ |
| टाटा वितरण | ११३.१९ | १२८.०० |
| अदानी इलेक्ट्रीसाटी मुंबई लि.- वितरण | २०५.१८ | २३२.०४ |
| बेस्ट | १०६.४२ | १२०.३५ |
| मध्य रेल्वे / भारतीय रेल्वे | ५४.५० | ६१.६४ |
| माईंडस्पेस बिझनेस पार्कस प्रा. लि. | १.०४ | १.१७ |
| गिगाप्लेक्स इस्टेटस प्रा. लि. | ०.५५ | ०.६२ |
| निदार युटीलिटीज पनवेल एलएलपी | ०.३५ | ०.४० |
| केआरसी इनफ्रास्ट्रक्चर प्रॉजेक्टस आणि प्रा लि. | ०.४० | ०.४५ |
| महाराष्ट्र विमानतळ विकास महामंडळ | १.६९ | १.९१ |
| इ ऑन फेज-१ | ०.८९ | १.०० |
| इ ऑन फेज-२ | ०.३७ | ०.४२ |
| जे एन पी टी | ०.०६ | ०.०७ |
| लक्ष्मीपती बालाजी | ०.०९ | ०.१० |
| **एकूण** | **३५६७.८८** | **४०३४.८९** |

यापुढे बहु वर्षीय वीज दर विनिमय, २०१९ नुसार म.रा.भा.प्रे.कें.ची शुल्क प्रति मे.वॅट प्रति महिना खालील सुत्रानुसार मोजले जातील.

मासिक म.रा.भा प्रे.कें.शुल्क (रू/ मे.वॅट /माहे ) = [AFC (u) (t) ÷ ∑ [Base TCR (u)] (t)] ÷ 12

त्यानुसार, प्रस्तावित म.रा.भा प्रे.कें.शुल्क खालीलप्रमाणे येते.

**तक्ता ६ - आर्थिक वर्ष २०२३-२४ ते आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी म.रा.भा प्रे.कें.शुल्क (रू/ मे.वॅट /माहे )**

| मसिक म.रा.भा प्रे.कें.शुल्क | आर्थिक वर्ष २३-२४ | आर्थिक वर्ष २४-२५ |
|---|---|---|
| एकूण म.रा.भा प्रे.कें.शुल्क (रु.लाख) | ३५६७.८८ | ४०३४.८९ |
| आधारभूत पारेषण क्षमता अधिकार (एमडब्ल्यू) | २४८५६ | २५६०८ |
| प्रस्तावित म.रा.भा प्रे.कें.शुल्क (रु/./एमडब्ल्यू/महिना) | ११९६.१८ | १३१३.०४ |

म.रा.भा प्रे.कें.ला खालीलप्रमाणे आर्थिक वर्ष २३-२४ ते आर्थिक वर्ष २४-२५ या कालावधीसाठी म.रा.भा प्रे.कें.ला खालील प्रस्तावित शुल्क आणि आकारण्याची आणि वसूल करण्याची परवानगी द्यावी. अशी नम्रपणे विनंती आहे.

**तक्ता ७ - आर्थिक वर्ष २३-२४ ते आर्थिक वर्ष २४-२५ साठी प्रस्तावित शुल्क आणि प्रभार**

| तपशील | विदयमान शुल्क | प्रस्तावित शुल्क |
|---|---|---|
| नोंदणी / कनेक्शन शुल्क | २०,००० रुपये प्रति कनेक्शन | २०,००० रुपये प्रति कनेक्शन |
| शेडयुलिंग शुल्क | २२५० रुपये प्रतिदिन | २२५० रुपये प्रतिदिन |
| री-शेडयुलिंग शुल्क | रु २२५०प्रती पुनरावृत्ती | रु २२५० प्रती पुनरावृत्ती |
| एसटीओए अर्ज शुल्क | रु ७५०० प्रती अर्ज | रु ७५०० प्रती अर्ज |
| आरईसी प्रक्रिया शुल्क | रु १००० प्रती अर्ज | रु १००० प्रती अर्ज |

**प्रार्थना**

महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र आदरणीय आयोगाला प्रार्थना करते,

१. महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग (बहु वर्षीय वीज दर) विनिमय, २०१९ च्या विनिमय ५.1 नुसार मध्यावधी पुर्नविलोकन याचिका स्वीकारा.

२. महाराष्ट्र भार प्रेषण केंद्र च्या आर्थिक वर्ष २०१९-२० ते आर्थिक वर्ष २०२१-२२ साठी संबंधित आर्थिक वर्षासाठी लेखापरीक्षित लेखे आणि वाटप विवरणावर आधारित आणि महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग (बहु वर्षीय वीज दर) तसेच बहु वर्षीय प्रशुल्क विनिमय, २०१९ आणि महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग (बहु वर्षीय वीज दर) विनिमय, २०१९ अंतर्गत लागू असलेल्या तरतुदींनुसार अंतिम समायोजनासाठी अनुमती दया.

३. वित्तीय वर्ष २०२० -२१ तसेच वित्तीय वर्ष २०२१-२२ मध्ये दुरुस्ती करून संतुलन साधण्याकरिता (अर्थात) कार्यक्षमतेच्या मापदंडामुळे नुकसान आणि नफा वाटप (सामायिक) करण्यापुर्वी वित्तीय वर्ष २०१९-२० साठी अंतिम समायोजन मंजूर खर्चाच्या आधारे संचलन आणि सुव्यवस्था खर्चाचा विचार केला जाऊ शकतो. याचिकाकर्त्याची आयोगाला नम्र विंनती आहे की भविष्यातील वर्षांसाठी (आर्थिक वर्ष २०२०-२१ आणि आर्थिक वर्ष २०२१-२२) आधारभूत वर्ष २०१९-२० मध्ये (म्हणजे नफा तोटा सामायिक केल्यानंतर ) साध्य केलेल्या कामगिरीच्या आधारे संचलन व सुव्यवस्था खर्च गृहित धरू नये. मागील वर्षांत (म्हणजेच नफा तोटा सामायिक करून घेतल्यावर) केलेल्या कामगिरीच्या आधारे भविष्यातील वर्षांच्या कामगिरीचे मूल्यांकन करणे या घडीला योग्य ठरणार नाही. बहूवर्षीय दरपत्रक अर्थात (समायोजन) विनियम-२०१९ अंतर्गत विनिमय १०५: सवलतीचे अधिकार मध्ये उल्लेखित अधिकारांचा लाभ घेऊन आयोग वित्तीय वर्ष २०२०-२१ आणि आर्थिक वर्ष २०२१-२२ साठी संचलन सुव्यवस्था खर्चाची पुर्नगणना करण्याच्या पदधतीचा पुर्नविचार करून तसेच यात सुधारणा करण्यासाठी निर्णय घेऊ शकतो.

४. याचिकाकर्त्यामार्फत सादर करण्यात आलेल्या तपशिलवार स्पष्टीकरणानुसार आधीच्या कालावधीच्या भांडवलीकरण (कॅपिटलायझेशन) सह याचिकाकर्त्याच्या लेखा परिक्षित खात्यानुसार जी एफ ए अर्थात एकूण स्थिर मालमत्ता आणि भांडवलीकरण याला परवानगी द्यावी तसेच मंजूर करावे.

५. महाराष्ट्र वीज नियामक आयोग (एमईआरसी) बहुवर्षीय दरपत्रक (मल्टी इयर दरपत्रक) २०१९ अंतर्गत लागू तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र,ऐरोली च्या आर्थिक वर्ष २०२२-२३ करिता तात्पुरते समायोजनासाठी परवानगी दयावी.

६. वित्तीय वर्ष २०२२-२३ पासून आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी आर्थिक वर्ष २०२०-२१ आणि आार्थिक वर्ष २०२१-२२ च्या (नफा आणि तोटा सामायिक करण्यापूर्वी) सरासरी खर्चाचा विचार करून याचिकाकर्त्या मार्फत संचलन आणि सुव्यवस्था खर्चासाठी प्रस्तावित अंदाजित खर्चांना मंजुरी दयावी. तसेच आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये सुधारित वेतन खर्च गृहीत धरलेला नाही त्यामुळे जो एम वाय टी विनिमय २०१९ अनुसार आधारभूत वर्ष म्हणून गृहीत धरले आहे. माननीय आयोगाला याचिकाकर्त्याची नम्र विनंती आहे की, एम वाय टी नियमन २०१९ अंतर्गत नियमन १०५ सवलतीचे अधिकार अंतर्गत वरील सवलत दयावी.

७. याचिकाकर्ता विनंती करतो की, महाराष्ट्र वीज नियामक आयोग (एमईआरसी) एमवायटी विनिमय २०१९ अनुसार आर्थिक वर्ष २०२३-२४ पासून वित्तवर्ष २०२४-२५ पर्यंत महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र, ऐरोली शुल्क मंजूर करावे जेणेकरून चौथ्या नियंत्रण कालावधीच्या उर्वरित काळासाठी संबंधित वर्षांकरिता एकत्रित ए आर आर पुर्नप्राप्त करण्यास मदत होईल.

८. आर्थिक वर्ष २०१९-२० पासून आर्थिक वर्ष २०२४-२५ या काळात भांडवलीकरण खर्चाचा वित्त पुरवठा करण्यासाठी एलडीसीडी फंडाची स्थापना २०१९ च्या केस क्रमांक २९१ मधील म.रा.भा.प्रे.कें.एम वाय टी आदेशात माननीय आयोगाने केली आहे. त्या नुसार म.रा.भा.प्रे.कें.ला भांडवली खर्चासाठी निधीचा उपयोग करण्याची मुभा दयावी.

९. विनंती करण्यात येते की, माननीय आयोगाने म.रा.भा.प्रे.कें. एम वाय टी प्रकरण २०१९ चे २९१ मध्ये दिलेल्या आदेशानुसार मान्यता दिल्याप्रमाणे विविध शुल्क जसे अल्पकालीन मुक्त अर्ज प्रक्रिया शुल्क नोंदणी/कनेक्शन शुल्क , शेडयुलिंग शुल्क, री-शेडयुलिंग शुल्क, एसटीओए अर्ज शुल्क, आरईसी प्रक्रिया शुल्क पुढे चालू ठेवावे.

१०. सदर याचिकेला मान्यता देताना त्यात मागणी केल्याप्रमाणे काही मापदंड शिथिल करण्यासाठी म.रा.भा.प्रे.कें. यांची विनंती मंजूर करावी.

११. वेळोवेळी आवश्यक असेल त्या ठिकाणी याचिकाकर्त्याला याचिकेत दुरूस्ती करण्याची परवानगी दयावी.

१२. या प्रकरणात सुनावणी करताना माननीय आयोगापुढे व्यक्तिीगतरित्या उपस्थित राहावयाची संधी दयावी

१३. अनावधानाने काही गोष्टी वगळल्या गेल्या असतील/ चूक झाली असेल काही त्रुटी असतील त्यांना माफ करून याचिकाकर्त्याला पुढील तारखेवर आवश्यक असेल त्याप्रमाणे बदल / परिवर्तन तसेच काही त्रुटी राहिल्यास ते दूर करून पुढे सादर करण्याची परवानगी दयावी.

ठिकाण: ऐरोली, नवी मुंबई
तारीख: ०७/१२/२०२२

मुख्य अभियंता
महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र,ऐरोली.